# शैक्षणिक नेतृत्व, प्रशिक्षण आणि मर्गदर्शनासाठी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमीशी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा सामंजस्य करार



## कुलगुरुंना मंत्री महोदयांकडून शुभेच्छा



> विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी हा सामंजस्य करार करण्याकरीता पुढाकार घेतला. त्यांच्या पुढाकारामुळे महाराष्ट्रातील शैक्षणिक नेतृत्व करणारे विविध विद्यापीठांच्या प्राधिकरणांचे सदस्य, प्राचार्य, शैक्षणिक विभाग प्रमुख, समन्वयक आदिंच्या ज्ञानामध्ये भर पडणार आहे. त्यामुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासाला चालना मिळून त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी यांच्यामध्ये शैक्षणिक नेतृत्व, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन करण्याकरीता पुणे येथे नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. श्री चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ. विकासचंद्र रस्तोगी, कुलगुरूडॉ. दिलीप मालखेडे, प्र - कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, एमएसएफडीए चे कार्यकारी संचालक डॉ. निपूण विनायक, एच. आर. डी, सी. संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर, तंत्र शिक्षण संचालक डॉ. अभय वाघव आदि मान्यवर उपस्थित होते.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था,

### सामंजस्य करारामुळे शैक्षणिक नेतृत्व, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन

पुणे यांच्यात झालेल्या सामंजस्य करारामुळे शैक्षणिक नेतृत्व करणारे विद्यापीठ प्राधिकरण, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, अभ्यास मंडळे, शैक्षणिक प्रमुख, समन्वयक, विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य आदिंना प्रशिक्षण आणि मार्गदर्शन प्राप्त होणार आहे. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी आणि विकासासाठी याचा फार मोठा फायदा होईल.सामंजस्य करारामुळे एमएसएफडीए तज्ज्ञ मार्गदर्शक विद्यापीठाला उपलब्ध करुन देतील. त्या मार्गदर्शकांच्या शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवाचा व मार्गदर्शनाचा लाभ प्रशिक्षणार्थ्यांना होईल. अकादमी तर्फे विद्यापीठाला आर्थिक सहाय्य सुध्दा प्राप्त होईल.

# विद्यार्थी प्रेरणा (इंडक्शन प्रोग्रॅम) कार्यक्रम संपन्न

स्थानिक अमरावती विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागात विभागाच्या समन्वयक प्रा. अरुणा तसरे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३ सप्टेंबर २०२२ रोजी एम. ए. भाग -१ व २ च्या विद्यार्थ्यांकरीता प्रेरणा कार्यक्रमाचे (इंडक्शन प्रोग्रॅम) आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन व संत गाडगे बाबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रारंभी नवीन विद्यार्थ्यांना सर्वांचा परिचय करुन देण्यात आला. या कार्यक्रमाला डॉ. वनिता एस. राऊत व डॉ. प्रविणकुमार मोहोड यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थी इंडक्शन प्रोग्रॅमच्या अनुषंगाने प्रा. अरुण तसरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टीमबाबत विस्तृत मार्गदर्शन करीत सविस्तर माहिती दिली. तसेच डॉ. वनिता एस. राऊत, डॉ. प्रविणकुमार मोहोड, प्रा. श्रध्दा हरकंचे, प्रा. शुभदा वैद्य, प्रा. भावना गव्हाळे आणि विभागाचे कनिष्ठ सहायक श्री राजू इंगोले यांनी विद्यार्थ्यांचे उद्बोधन केले. कार्यक्रमासोबतच नव्याने प्रवेशित एम. ए. भाग -१ च्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ सुध्दा आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी एम. ए. भाग - २ च्या विद्यार्थ्यांनी नव्याने प्रवेशित एम. ए. भाग - १ च्या विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले व सर्वांशी परिचय करुन दिला. तसेच विभागातील सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना घेऊन सर्व कार्यालयांना भेटी देऊन विद्यापीठाच्या कार्यालयाची माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शुभदा वैद्य यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. वनिता एस. राऊत यांनी केले.